# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः01.05.2024** **वारःबुधवार**

---

1. राज्यात लोकसभा निवडणुकीच्या प्रचारानं वातावरण तापलं; कालही पंतप्रधान आणि ज्येष्ठ भाजपा नेते नरेंद्र मोदी यांच्या सभांचा धडाका
2. महाराष्ट्र दिनानिमित्त राज्यभर विविध कार्यक्रमांचं आयोजन
3. आकाशवाणी पुणे केंद्राच्या प्रादेशिक वृत्तविभागाचं सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण आणि
4. राज्यात उन्हाची काहिली सुरूच, पुढचे दोन तीन दिवस तापमानातली वाढ कायम राहण्याचा हवामान विभागाचा इशारा

**प्रचार**

राज्यात लोकसभा निवडणुकीच्या प्रचारानं वातावरण तापलं असून सर्वच पक्षांचे नेते जोरदार प्रचार करत आहेत. महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी ज्येष्ठ भाजपा नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कालही राज्यात प्रचारसभा झाल्या. उस्मानाबाद मतदारसंघातल्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या उमेदवार अर्चना पाटील, माढ्याचे उमेदवार रणजितसिंह नाइक निंबाळकर आणि लातूरमधले भाजपा उमेदवार सुधाकर शृंगारे यांच्या प्रचारासाठी या सभा आयोजित करण्यात आल्या होत्या.

गेल्या 10 वर्षात भाजपाच्या नेतृत्वातल्या लोकशाही आघाडी सरकारनं शेतकऱ्यांसाठी सवलतीच्या दरात खतं उपलब्ध करुन दिली, शेतकरी उत्पादक कंपन्यांना सहाय्य केलं तसंच त्यांच्या शेततली ज्वारी आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवण्याचं काम केलं असं मोदी यांनी धाराशिवमधल्या प्रचारसभेत सांगितलं.

देशात मजबूत सरकार असेल, तरच वर्तमान काळाबरोबरच भविष्याकडे लक्ष देता येतं. त्यामुळे काम करण्याची पुन्हा एकदा संधी द्या असं आवाहन नरेंद्र मोदी यांनी माढा मतदारसंघातल्या माळशिरस इथं झालेल्या सभेत केलं. काँग्रेसनं गरिबी हटवण्याच्या फक्त घोषणाच दिल्या अशी टीका त्यांनी केली. सहकार क्षेत्राला गती देण्यासाठी केंद्र शासनानं स्वतंत्र मंत्रालय स्थापन केलं. येत्या काही दिवसात देशात नव्यानं बाजार समित्या स्थापन करण्यात येणार आहेत असं मोदी म्हणाले.

लातूरमध्ये झालेल्या प्रचारसभेत त्यांनी सुरुवातीलाच लातूरची ओळख बनलेल्या शिक्षण क्षेत्रातल्या लातूर पॅटर्नचा उल्लेख केला. विरोधकांच्या दरवर्षी पंतप्रधान बदलण्याच्या प्रस्तावावर टीका करतानाच देशाच्या प्रगतीसाठी आणि सुरक्षेसाठी स्थिर, सक्षम नेतृत्वाची गरज असल्याच्या मुद्द्यावर मोदी यांनी भर दिला.

महाविकास आघाडीतर्फे काल पुण्यात जाहीर सभा घेण्यात आली. या सभेत शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांनी सत्ताधाऱ्यांवर शरसंधान साधलं. शरद पवार यांनी आपल्या भाषणात महागाई आणि बेरोजगारी या मुद्द्यांना हात घालत

केंद्र सरकारवर टीका केली. तर भाजपामध्ये महाराष्ट्राबद्दल द्वेष असल्याचा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला. यावेळी त्यांनी नरेंद्र मोदींवर घणाघाती टीका केली.

रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघातले शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार विनायक राऊत यांनी राजापूर तालुक्यातल्या पाचल इथं जाहीर सभा घेतली. यावेळी त्यांनी नारायण राणेंच्या उमेदवारीवरुन महायुतीवर टीका केली.

नारायण राणे यांच्या प्रचारासाठी रत्नागिरीत राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत प्रमुख पदाधिकाऱ्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. केंद्र सरकार महिला, युवक, शेतकरी आणि गरिबांचं जीवनमान सुधारण्यासाठी कार्यरत आहेत. यावर बोलण्याचे कुठलेच मुद्दे विरोधकांकडे नसल्याने ते जातिभेद निर्माण करत आहेत असं राणे यावेळी म्हणाले.

**<u>उमेदवारी अर्ज</u>**

लोकसभा निवडणूकीच्या पाचव्या टप्प्यासाठी काल भाजपा नेते पीयूष गोयल यांनी उत्तर मुंबई मतदार संघातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. देशाची विकासयात्रा यापुढेही सुरू राहील असं सांगून आपण उत्तर मुंबईत पायाभूत सुविधा, वाहतूक व्यवस्था, शिक्षण, आरोग्य अशा सर्वच क्षेत्रात विकास कामं करणार असल्याचं गोयल यावेळी वार्ताहरांशी बोलताना म्हणाले.

धुळ्यात महाविकास आघाडीतर्फे काँग्रेसच्या उमेदवार डॉक्टर शोभा बच्छाव यांनी जोरदार शक्तीप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केला. महाविकास आघाडीच्या घटक पक्षांची महारॅली यावेळी काढण्यात आली. पालघर मतदारसंघात विजया म्हात्रे यांनी वंचित बहुजन आघाडीतर्फे उमेदवारी अर्ज भरला. दरम्यान मुंबई उत्तर लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसनं भूषण पाटील यांना उमेदवारी दिली असून शिवसेनेनं वायव्य मुंबईतून रविंद्र वायकर आणि दक्षिण मुंबईतून यामिनी जाधव यांना उमेदवारी जाहीर केली आहे.

**<u>उमेदवारी-नाशिक</u>**

नाशिकच्या जागेवरील दावा भाजपाने सोडला असल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल दिली. नाशिकच्या जागेसंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार एकत्रितपणे निर्णय घेतील आणि असंही बावनकुळे यांनी सांगितलं. येत्या दोन मे रोजी महायुतीचे जिल्ह्यातील दोन्ही उमेदवार संयुक्त मिरवणूक काढून उमेदवारी अर्ज दाखल करतील असं छगन भुजबळ यांनी सांगितलं.

**<u>महाराष्ट्र दिन</u>**

65 वा महाराष्ट्र दिन आज साजरा होत आहे. यानिमित्त आज राज्यभरात विविध कार्यक्रम होत आहेत. मुंबईत दादरच्या शिवाजी पार्कवर होणाऱ्या प्रमुख कार्यक्रमात राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे. विविध जिल्ह्यांच्या ठिकाणी पालकमंत्र्यांच्या तसंच जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त यांच्या हस्ते सकाळी 8 वाजता ध्वजारोहणाचा शासकीय कार्यक्रम होणार आहे. यावेळी निवडणूक आयोगाच्या आदर्श आचारसंहितेचं तंतोतंत पालन करावं, त्याचं उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी असं राजशिष्टाचार विभागानं सर्व संबंधितांना परिपत्रकाद्वारे कळवलं आहे.

**<u>प्रादेशिक वृत्त विभाग</u>**

आकाशवाणी पुणे केंद्राचा प्रादेशिक वृत्त विभाग आज सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करत आहे. 1 मे 1975 रोजी आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन पहिल्यांदा प्रादेशिक बातमीपत्र प्रसारित झालं. पुणे वृत्तविभागाचे पहिले वृत्तसंपादक चंद्रशेखर कारखानीस या विभागाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त आपल्या भावना व्यक्त करताना म्हणाले.....

त्यावेळच्या वृत्तनिवेदकांपैकी एक म्हणजे सुधा नरवणे. त्यांच्या आकाशवाणीतल्या आठवणींना उजाळा दिला आहे त्यांचे सुपुत्र, देशाचे निवृत्त लष्करप्रमुख जनरल मनोज नरवणे यांनी....

**<u>तुकडोजी महाराज जयंती</u>**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती काल राज्यभरात साजरी झाली. मंत्रालयात वरीष्ठ अधिकाऱ्यांनी तुकडोजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं. विविध जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयात तसंच अन्य शासकीय कार्यालयांमध्ये तुकडोजी महाराजांना जयंतिनिमित्त अभिवादन करण्यात आलं.

**<u>अपघात-नाशिक</u>**

नाशिक जिल्ह्यात चांदवड तालुक्यातल्या राहुड घाटात काल राज्य परिवहन महामंडळाची बस ट्रकवर आदळून झालेल्या अपघातात 4 प्रवासी ठार झाले. आणि 33 प्रवासी जखमी झाले आहेत.

**<u>अपघात-रायगड</u>**

मुंबई-पुणे महामार्गावर कुंभवलीजवळ चालकाचं गाडीवरचं नियंत्रण सुटल्याने कार 50 फुट खोल खड्ड्यात पडली. काल दुपारी झालेल्या या अपघातात तिघांचा मृत्यू झाला; तर तीनजण जखमी झाले आहेत.

**<u>हवामान</u>**

राज्यात सर्वत्र उन्हाचा ताप वाढतोच आहे. उन्हाच्या वाढत्या चटक्यांमुळे नागरिक हैराण झाले आहेत. काल सोलापुरात तापमानाचा पारा 44 अंशांवर गेला. मालेगाव इथंही 44 अंश सेल्सियस कमाल तापमानाची नोंद झाली. आज कोकणासह मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. कोकणात उष्णतेची लाट पुढचे तीन दिवस कायम राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे. त्यामुळे नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी, विनाकारण घराबाहेर पडू नये तसंच उन्हापासून बचावासाठी टोपी, स्कार्फ, गॉगल, छत्री इत्यादी साधनं वापरावीत, भरपूर पाणी प्यावं, सकस संतुलित आहार घ्यावा असं आवाहन वैद्यकीय तज्ज्ञांनी आणि प्रशासनानं केलं आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.